महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

जलसंपदा विभागाच्या विविध प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या सातबारावर इतर अधिकारात असलेले पुनर्वसनासाठी राखीव असे शेरे तातडीने काढून टाकण्याबाबत.

(१) ४६६ (२३-१२-२०१४). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक १ सप्टेंबर, २०१४ रोजी जलसंपदा विभागाच्या विविध प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या सातबारावर इतर अधिकारात असलेले पुनर्वसनासाठी राखीव असे शेरे तातडीने काढून टाकण्याबाबत अध्यादेश जाहिर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ज्या प्रकल्पांसाठी भुसंपादन प्रक्रिया पुर्ण झालेली नाही व ज्यांचे निवाडे झालेले नसून अशा जमिनींच्या सातबारावरील पुनर्वसनासाठी राखीव असे शेरे काढण्यात येतील असे अध्यादेशात जाहीर केले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्हा शिरुर, हवेली, दौंड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमिनीवर टाकलेले भामा आसखेड, चासकमान, इत्यादी पुनर्वसनासाठी राखीव असलेले शेरे काढण्याबाबत जिल्हाधिकारी पुणे यांनी सुचना केल्याचे माहे नोव्हेबर, २०१४ च्या पहिल्या आठवड्यात जाहीर केले होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन स्तरावरून याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. एकनाथराव खडसे (१०-१२-२०१५) : (१) अंशत: खरे आहे.

शासनाने लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या जमिनीवर पुनर्वसनासाठी राखीव शेरे काढुन टाकण्यासाठी शासन निर्णय क्रमांक आरपीए/२३१४/प्र.क्र.१०१ र-४ दिनांक ०२.०९.२०१४ रोजी निर्गमीत केला होता.

(२), (३) व (४) सदरील शासन निर्णयात- भुसंपादनाची कोणतीही कार्यवाही सुरु करण्यात आली नसल्यास, किंवा अधिसुचनेच्या टप्प्यावर भुसंपादन प्रस्ताव व्यपगत झाला असल्यास, किंवा भुसंपादन कायद्यातील तरतुदीनुसार भुसंपादनाचे निवाडे मुदतीत पूर्ण करण्यात आले नसल्यास किंवा प्रकल्प यंत्रणेने सदर क्षेत्र लाभक्षेत्रात येत नसल्याबाबत सुधारीत प्रस्ताव सादर

केल्यास प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र भुधारकांच्या जमिनींच्या हस्तांतरण व्यवहारावर निर्बंध घालण्यासाठी नोंदविलेले शेरे उठविण्यास मान्यता देण्यात आली होती.
तथापि, शासन निर्णय क्रमांक आरपीए/१९९/प्र.क्र.११८/र-४ दिनांक ०१.०८.२०१५ अन्वये शासन निर्णय क्रमांक आरपीए/२३१४/प्र.क्र.१०१/र-४ दिनांक ०१.०९.२०१४ रद्द करण्यात आला आहे.

हुपरी (जि.कोल्हापूर) येथील गट नं. ९२५/४ अ मधील काळम्मावाडी धरणग्रस्त वसाहतीतील विकासकामांसाठी आरक्षित असलेल्या जागेवर जलकुंभ उभारण्यात येत असल्याबाबत

(२) २८३८ (१५-०१-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हुपरी (जि.कोल्हापूर) येथील गट नं.९२५/४ अ मधील काळम्मावाडी धरणग्रस्त वसाहतीतील विकासकामांसाठी आरक्षित असलेल्या जागेवर जलकुंभ उभारण्यास धरणग्रस्तांनी माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास विरोध केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. एकनाथराव खडसे (०९-१२-२०१५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हूपरी येथील सदर गटाची स्थळ पाहणी केली असता त्या ठिकाणी जलकुंभाच्या उभारणीसाठी जमीन सपाटीकरणाचे काम सुरु होते. ग्रामपंचायत व तक्रारदार यामध्ये बैठक आयोजित करुन गट नं ९२५/४ "अ" मधील २७५२.७५ चौ.मी. खुल्या जागेवर भारत निर्माण योजनेवरील जलकुंभाच्या बांधकामाबाबत सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगी शिवाय कोणतीही कार्यवाही करू नये अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

चांदूर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील मालखेड लघू सिंचन प्रकल्पाधारकांच्या जमिनी भोगवटदार-१ मध्ये करण्याबाबत

(३) ५६७४ (०४-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदूर रेल्वे तालुक्यातील (जि.अमरावती) मालखेड लघू सिंचन प्रकल्पामध्ये घेण्यात आलेल्या जमीन धारकांचे पुनर्वसन सन १९७२ दरम्यान मौजा ना सावंगा येथे करण्यात आले असून महसूल विभागामार्फत संबंधीत प्रकल्पग्रस्तांना जमिनी दिलेल्या असून सदर जमिनीचा भोगवटदार वर्ग-२ आहे यामुळे प्रकल्पग्रस्तांना कृषी कर्ज, जमीन विक्री प्रकरणी अडचणी असल्याने त्यांची सदर जमिनी भोगवटवार-१ मध्ये करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी

दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी उपविभाग अधिकारी, चांदूर रेल्वे यांच्याकडे निवेदन दिले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीचे भोगवटदार वर्ग-२ चे भोगवटदार वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्याची कार्यवाही विना विलंब करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२५-०१-२०१६) : (१) होय.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या दि. १६.०५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये शासन परिपत्रक २४.१२.२००४ अन्वये शासनास भरणा करण्याची कब्जे हक्कांची १००% रक्कमेची आकारणी कोणत्या दराने व नियमानुसार करण्यात यावी व त्याची परिगणना कशी करण्यात यावी याबाबत शासन स्तरावरुन मार्गदर्शन मागविले होते, त्याबाबत शासन पत्र क्र. आरपीए २०१५/ प्र.क्र.१७३/१५/र-१ दि. ०४.०९.२०१५ अन्वये विभागीय आयुक्त, अमरावती यांना कळविण्यात आले आहे.

सातारा जिल्ह्यातील कोयना जलविद्युत प्रकल्पग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याबाबत

(४) ७०७२ (०४-०४-२०१४). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कोयना जलविद्युत प्रकल्पग्रस्तांचे सन १९६० मध्ये ठाणे जिल्ह्यामध्ये पुनर्वसन करण्यात आले मात्र सदर प्रकल्पग्रस्तांच्या समस्या अद्यापही सोडविण्यात आलेल्या नसून प्रकल्पग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी येथील प्रकल्पग्रस्तांनी माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात तसेच वारंवार मा.मुख्यमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे मागण्या सादर केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी सादर केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच सुमारे पंचावन्न वर्षापासून कोयना प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्यात अपयश आलेले असल्याने यासंदर्भात कायमस्वरुपी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२१-०३-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.

(२) उपरोक्त निवेदनातील मागण्या प्रामुख्याने प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन, शासकीय नोकरी तसेच नागरी सुविधा मिळणे असे आहे. त्यानुसार सातारा जिल्ह्यातील कोयना

प्रकल्पाग्रस्तांचे पुनर्वसन सातारा, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सांगली व सोलापूर या जिल्ह्यांमध्ये करण्यात आले असून प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटपाची कार्यवाही संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील पुनर्वसन शाखेकडून करण्यात येते. ठाणे जिल्ह्यातील कोयना प्रकल्पग्रस्तमांना नागरी सुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने सन २००९ ते २०१६ दरम्यान शासन स्तरावरुन रुपये २,४७,८२,६६६/- इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मधील तरतूदीनुसार प्रकल्पग्रस्तांना शासकीय / निमशासकीया सेवेत ५% आरक्षण/प्राथम्यक्रम कोटा ठेवण्यात आलेला आहे.

(३) कोयना प्रकल्पगस्तांना देय लाभांचे ऐवजी द्यावयाचे आर्थिक पॅकेज विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाहतूक विभागाचा कुठलाही परवाना तसेच योग्य कागदपत्रे नसताना असंख्य बेकायदा रिक्षा शिवाजीनगर, गोंवडी व चेंबूर परिसरात असल्याबाबत

(५) ८४७३ (०४-०४-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाहतूक विभागाचा कुठलाही परवाना तसेच योग्य कागदपत्रे नसताना असंख्य बेकायदा रिक्षा शिवाजीनगर, गोवंडी व चेंबूर परिसरात चालत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ठिकठिकाणी आतापर्यंत चालत असलेल्या किती बेकायदा रिक्षा चालकांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (१५-०१-२०१६) :(१), (२) व (३) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पुणे) यांचे कार्यक्षेत्रात त्यांचेकडील वायूवेग पथकामार्फत एप्रिल, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधीत अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या ऑटोरिक्षांचा शोध घेण्याकरिता तपासलेल्या एकूण ५९६० वाहनांपैकी दोषी आढळलेल्या ३०३५ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच वाहन तांत्रिकदृष्ट्या अकार्यक्षम असल्याने रिक्षाचालकांनी स्वतं:हून नोंदणी रद्द करण्यासाठी अर्ज केलेल्या व वाहनास १६ वर्षे पुर्ण झाल्याने ते परवान्यावरून उतरवून नोंदणी रद्द करण्यासाठी अर्ज केलेल्या अशा एकूण ५९५० रिक्षांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. ही नोंदणी रद्द केलेली वाहने पुन्हा वापरली जाऊ नयेत म्हणून प्रोदशिक परिवहन कार्यालयाच्या अधिकाऱ्यांसक्षम तुकडै करुन भंगारांत काढण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील उंडरी धरणाच्या लाभक्षेत्रातील मूळ मालकांच्या जमिनी परत करण्याबाबत

(६) ८५९५ (०७-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील उंडरी धरणाच्या लाभक्षेत्रातील मूळ मालकांच्या जमिनी परत कराव्यात असा आदेश सर्वोच्य न्यायालयाने दिल्याची बाब माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दौंड तालुक्यात ३६० प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ५८ प्रकरणात मूळ शेतमालक आणि शेती विकत घेणारा व अधिकारी यांच्या साक्षी नोंदविल्या, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाब १, २ व ३ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर शासनाद्वारे अद्याप काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, कारवाईस होणा-या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२१-१२-२०१५) : (१) हे खरे नाही. अशा प्रकारचे कोणतेही आदेश मा.सर्वोच्च न्यायालयाकडून प्राप्त झालेले नाही.

(२), (३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे राहेरा (ता.मोताळा जि. बुलढाणा) या गावांच्या पुर्नवसनाबाबत

(७) ९४३० (१०-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे राहेरा (ता.मोताळा जि.बुलडाणा) हे संपुर्ण गाव व्याघ्रा नाला प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाअंतर्गत बाधीत व्यक्तीच्या पुनर्वसन व भुसंपादनाच्या कार्यवाहीस विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(३) सदर प्रकल्पा अंतर्गत राहेरा गावांच्या पुर्नवसनाबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१३-०१-२०१६) : (१) हे खरे नाही.

मौजे राहेरा ता.मोताळा जि.बुलढाणा हे संपुर्ण गांव व्याघ्रा नाला प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येत नसुन राहेरा संग्राहक ल.पा. प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येते.

(२), (३) व (४) राहेरा गावाच्या प्रकल्पबाधीत व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी नवीन गावठाणाचा ले-आऊट नकाशा नगर रचनाकार, बुलढाणा यांनी मंजूर केला असून, पुनर्वसनाची पुढील कार्यवाही सुरु आहे.

मार्च २०१७ पर्यंत पुर्नवसनाची कामे पूर्ण करुन जुन २०१७ पुर्वी घळभरणी करण्याचे नियोजन आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील ड्रायव्हिंग स्कूल, ऑटो डिलर, पीयूसी सेंटर अशा संस्थाचे ओळखपत्र असल्याशिवाय प्रादेशिक परिवहन कार्यालयात प्रवेश देण्यात येणार नसल्याबाबत

(८) १३८२८ (०७-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील ड्रायव्हिंग स्कूल, ऑटो डिलर, पीयूसी सेंटर अशा संस्थाचे ओळखपत्र असल्याशिवाय प्रादेशिक परिवहन कार्यालयात प्रवेश देण्यात येणार नसल्याचे आदेश माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास काढले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार येथील एजंटांनी विविध ड्रायव्हिंग स्कूल, ऑटो डिलर, पीयूसी सेंटरचे प्रतिनिधी असल्याचे बनावट ओळखपत्र तयार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी अशा बनावट ओळखपत्रधारकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (१५-०१-२०१६) : (१) प्रादेशिक परिवहन कार्यालयांतील दलालांच्या वावरास आळा घालण्यासाठी अनधिकृत व्यक्तींना कार्यालयात प्रवेश नाकारण्याबाबत सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांना माहे जानेवारी, २०१५ मध्ये सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्रादेशिक परिवहन कार्यालय, कोल्हापूर यांनी परिपत्रक काढून वाहन वितरक, मोटार ड्रायव्हिंग स्कूल, पीयुसी सेंटर इत्यादींच्या प्रतिनिधींना कार्यालयात येताना ओळखपत्र बाळगणेबाबत सूचना दिल्या.

(२) अशा प्रकारचे बनावट ओळखपत्र दाखवून कार्यालयात प्रवेश मिळवण्याच्या प्रयत्नाचे एकही प्रकरण निदर्शनास आलेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

पर्यावरण कर (ग्रीन टॅक्स) थकीत असलेल्या वाहनांकडून वसूल करण्याबाबत

(९) १६२६९ (२६-०५-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परिवहन विभागाने जुन्या वाहनाच्या धुरामुळे होणाऱ्या प्रदुषणाला आळा घालण्यासाठी सुरु केलेल्या पर्यावरण कराच्या (ग्रीन टॅक्स) वसुलीच्या मोहिमेअंतर्गत राज्यातील काही प्रादेशिक

परिवहन कार्यालयाने वसुली मोहिम संथगतीने राबविल्यामुळे करोडो रुपयांच्या महसुलीची वसुली झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती कोणकोणत्या प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे किती थकबाकी आहे ती राहण्याची कारणे काय आहेत, याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (१८-०३-२०१६) :(१) ते (४) पर्यावरण कराची ३१ कार्यालयांतर्गत एकूण २०७, १५, ५७, ५९७ रुपयांची थकबाकी असून, ऑक्टोबर २०१० ते दि. ३१/०३/२०१५या कालावधीत महाराष्ट्र राज्यतील पर्यावरण कर वसुलीबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

कालावधी	पर्यावरण कर वसुली रक्कम (रुपये कोटी)
दि. १५/१०२०१० ते दि. ३१/०३/२०११	१०.४२
२०११-२०१२	४२.२६
२०१२-२०१३	३८.५०
२०१३-२०१४	४४.४९
२०१४-२०१५	४१.४३

पर्यावरण कर थकीत असलेल्या वाहनांकडून कर वसुली करणेसाठी प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांमार्फत मोटार वाहन निरीक्षक यांना तसेच फिरते पथकातील अधिकाऱ्यांना पर्यावरण कर वसुलीबाबत आदेश देण्यात आले आहे. पर्यावरण कर थकीत असलेल्या वाहनधारकांना कर मागणीपत्रे पाठवून थकीत कराची वसुली करण्यात येत आहे.

पर्यावरण कर न भरणाऱ्या वाहनांना नोटीस पाठविणे, वायुवेग पथकामार्फत पर्यावरण कर वसुलीसाठी प्रयत्न करणे, महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम, १९५८च्या कलम १६ अन्वये खटला दाखल करणेबाबत विशेष मोहीम आखण्यात यावी, अशाही सूचना सर्व कार्यालयांना देण्यात आलेल्या आहेत.

राज्यात सोयाबीन बियाणांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असता उगवण क्षमता ५० टक्केपेक्षा कमी असल्याबाबत

(१०) १६६३६ (१९-०८-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सोयाबीन बियाणांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असता चार कंपन्यांच्या बियाणांमध्ये उगवण क्षमता ५० टक्केपेक्षा कमी असल्याचा अहवाल प्रयोगशाळेने कृषी विभागाला दिला असल्याने माहे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट दर्जाची बियाणे देऊन शेतक-यांची फसवणूक करणा-या चार कंपन्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-१२-२०१५) : (१) राज्यातील बीज परिक्षण प्रयोगशाळेत तपासणीसाठी प्राप्त झालेल्या सोयबीन बियाण्यांच्या नमुन्यांपैकी काही नमुने ५० टक्के पेक्षा कमी उगवण क्षमतेचे असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(२) कमी उगवण क्षमतेच्या अप्रमाणीत बियाण्यांप्रकरणी बियाणे नियंत्रण आदेश १९८३ मधील तरतूदीनुसार कायदेशीर कारवाई चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

घुईखेड (जि. अमरावती) येथील प्रकल्पग्रस्तांना भूखंडासंबंधी तात्काळ कार्यवाही करण्याबाबत

(११) १६९८० (१०-०८-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील घुईखेड येथील प्रकल्पग्रस्तांना भूखंडासंबंधी तात्काळ कार्यवाही करण्याकरीता मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमरास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२५-०१-२०१६) :(१) होय.
(२) बेंबळा प्रकल्पांतर्गत नवीन भूखंडाची मागणीसाठी ४४ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १४ अर्जदार पात्र नसल्याने त्यांची मागणी अमान्य करण्यात आली आहे. उर्वरित २९ अर्जदरांचे कुटूंबांना पूर्वी भूखंड वितरित झाले आहेत. मात्र कुटुंबांच्या विभागणीच्या अनुषंगाने योग्य ती चौकशी करण्यात येत असून चौकशीअंती उपलब्ध माहितीच्या आधारे सदर अर्ज निकाली काढण्यात येतील.

वारसाचे फेरफारबाबत ६ अर्ज प्राप्त असून सदर अर्ज वारसा प्रमाणपत्राअभावी प्रलंबित आहेत. आपसी, भूखंड बदलाबाबत ४ अर्ज प्राप्त असून यापूर्वी वाटप केलेल्या भूखंडाच्या उपयोगितेबाबतची सद्य:स्थिती तपासून कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अवकाळी पाऊस व गारपिटीने नुकसान झालेल्या शेतक-याला शासनाने जाहीर केलेली नुकसान भरपाईची रक्कम न मिळाल्याबाबत

(१२) १७०७२ (१२-०८-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडगांव (ता.शेवगांव,जि.अहमदनगर) येथील रविंद्र झिजुर्के यांच्या तीन एकर शेतातील पिकाची अवकाळी पाऊस व गारपिटीने झालेल्या नुकसान भरपाईपोटी शासनाने जाहीर केलेली ४००० रुपयांची रक्कम मिळविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, तहसीलदार व तलाठी यांच्याकडे जाण्या-येण्यासाठी झालेला ६०० रुपये प्रवास खर्च होऊनही त्यांना सरकारी मदत मिळाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती अशाच प्रकारची राज्यातील प्रकरणे निकाली काढण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०१-२०१६) : (१) वडगांव (ता.शेवगांव, जि.अहमदनगर) मध्ये गारपीट व अवकाळी पाऊस न झाल्याने सदर गावामध्ये गारपीट अनुदान वाटप झालेले नाही. तथापि श्री.रविंद्र झिजुर्के यांना सन २०१४ खरीप हंगातील दुष्काळी अनुदान रु. ५४९०/- इतके धनादेश क्र. २१४३५७ अन्वये त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

खरीप हंगामात नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

(१३) १७१४२ (२५-०८-२०१५). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरीप हंगामात नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत सिल्लोड तालुक्यातील संपूर्ण १३१ गावांचा समावेश करण्यात आला आहे परंतू प्रशासनाचा वेळकाढूपणा व खासगी बँकाची शेतक-यांबाबत अनास्था यामुळे उपलब्ध अनुदान मिळण्यास उशीर होत असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त तालुक्यातील शेतक-यांना तात्काळ अनुदान मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०१-२०१६) : (१) हे खरे नाही.

(२) खरीप हंगामात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत सिल्लोड तालुक्यातील एकूण ६२०७९ बाधित शेतकरी यांना अनुदान वाटप करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

धर्माबाद नगरपालिकांतर्गत (जि. नांदेड) रत्नाळी सज्ज्याचे तलाठी यांच्या चुकांमुळे दुष्काळग्रस्तांना अनुदानापासून वंचित ठेवल्याबाबत

(१४) १७४४८ (०६-०८-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद नगरपालिकांतर्गत रत्नाळी सज्ज्याचे तलाठी यांच्या अक्षम्य चुकांमुळे रत्नाळीचे जवळपास ३३ शेतकरी अद्यापही दुष्काळग्रस्तांना शासनातर्फे देण्यात येणा-या अनुदानापासून वंचित ठेवल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमरास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रत्नाळी येथील शेतकरी यांना दुष्काळी अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०१-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.
(२) नायब तहलिसदार यांचेमार्फत चौकशी करुन दुष्काळी अनुदानापासून वंचित राहिलेल्या ३४ शेतक-यांची यादी तयार करुन दि.७/७/२०१५ रोजी रक्कम रु. १,३३,७५०/- इतके अनुदान दुष्काळग्रस्त शेतक-यांच्या खात्यावर जमा करण्यासाठी बँकेत जमा करण्यात आले. तसेच संबंधित सज्ज्याचे तलाठी यांना उपविभागीय अधिकारी, धर्माबाद यांनी त्यांच्या दिनांक ७/७/२०१५ च्या आदेशान्वये निलंबीत केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

देवसरी, चिंचोली (संगम) व पळशी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील पुरग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत

(१५) १७४५० (०६-०८-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवसरी, चिंचोली (संगम) व पळशी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील पुरग्रस्तांच्या पुनर्वसन करण्यासाठी तहसिलदार, उमरखेड, यांची अभिप्रायासह प्रमाणपत्र त्वरीत पाठविण्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ, यांना दिनांक ८ मार्च, २०१५ रोजी कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, यवतमाळ यांना दिनांक ३ मार्च, २०१५ रोजी व उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, उमरखेड यांना दिनांक ३ मार्च, २०१५ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुरग्रस्तांचे पुनर्वसन करण्याकरीता अभिप्रायासह प्रमाणपत्र त्वरीत पाठविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०१-२०१६) :(१) होय.
(२) जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, यवतमाळ व उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, उमरखेड याचे नाहरकत प्रमाणपत्र क्षेत्रीय स्तरावर प्राप्त झाले असून त्यानुषंगाने सुधारीत प्रस्तावाबाबतची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

खाजगी बसेसकडून दुप्पट तिकटीचे दर आकारुन प्रवाशांची लुट सुरु असल्याबाबत

(१६) १७५१८ (०८-०९-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतून गोवा, कोकण, कोल्हापूर, सांगली, पुणे, सोलापूर येथे जाण्यासाठी सुट्टी व सणासुदीला खाजगी बसेसकडून दुप्पट तिकटीचे दर आकारुन प्रवाशांची लुट सुरु असल्याचे माहे मे, २०१५ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी तिकिट दरांवर सरकारचे नियंत्रण नसल्याने हा प्रकार सुरु आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी बसेसकडून प्रवाशांची लुट रोखण्यासाठी शासनाने खाजगी तिकिट दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी धोरण आखून शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (१५-०१-२०१६) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) खाजगी प्रवासी बसेसच्या तिकीट दरांवर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने किमान व कमाल दर निश्चितीसाठी अभ्यास अहवाल सादर करण्याचे काम पुणेस्थित सेंट्रल इंस्टीट्युट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट या संस्थेकडे सोपविले होते. संस्थेकडून अभ्यास अहवाल प्राप्त झाला असून पुढील बाब कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पैठण तालुक्यातील (जि.औरंगाबाद) तहसील प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे शेतकरी दुष्काळी अनुदानापासून वंचित असल्याबाबत

(१७) १८०१५ (१७-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण तालुक्यातील (जि.औरंगाबाद) तहसील प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे दुष्काळी अनुदान मिळण्यापासून १० हजार शेतकरी अनुदानापासुन वंचित राहिले असल्याबाबतची तक्रार अखिल भारतीय छावा संघटनेच्या जिल्हाध्यक्षांनी माहे मे, २०१५ दरम्यान निवेदनाद्वारे

विभागीय आयुक्तांना तक्रार करून याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसिल कार्यालयात दुष्काळी अनुदान मिळावे यासाठी गेलेल्या शेतकऱ्यांना तलाठ्याने हकलून दिले असेही तक्रारीत नमूद करून तलाठी क्षिरसागर यांना निलंबित करावे अशी मागणी निवेदनात करण्यात आलेली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पैठण तालुक्यातील दुष्काळी अनुदानापासून वंचित राहिलेल्या १० हजार शेतकऱ्यांना अनुदान मिळावे व शेतकऱ्यांना अपमानास्पद वागणूक देणाऱ्या तलाठ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात आली,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०१-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) तहसिलदार पैठण यांनी याबाबत संबंधित तलाठी यांना दिनांक २०/५/२०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस दिली व त्या अनुषंगाने संबंधित तलाठी यांनी त्यांचा खुलासा दि.२२/५/२०१५ रोजी सादर केला असता तहसिलदार पैठण यांनी सदर खुलासा अमान्य करुन संबंधित तलाठी यांना यापुढे अशा प्रकारची वर्तणूक होणार नाही याची दक्षता घेणेबाबत लेखी स्वरुपात ताकीद दिली. त्यानंतर तलाठी श्री.क्षीरसागर यांनी तलाठी पदाचा राजीनामा दिला. उपविभागीय अधिकारी, पैठण यांनी श्री.क्षीरसागर, तलाठी यांचा राजीनामा मंजूर करुन, त्यांना दि. १५/९/२०१५ रोजी मध्यान्हानंतर शासन सेवेतून सेवामुक्त करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जुलै २००५ ला आलेल्या महापुरानंतर रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण शहरासाठी दिलेली बोट देखभालीअभावी गेल्या ९ वर्षांपासून बेवारस स्थितीत असल्याबाबत

(१८) १८३९७ (१७-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण शहरासाठी शासनाने जुलै २००५ ला आलेल्या महापुरात अडकलेल्या नागरीकांना वाचविण्यासाठी एक बोट दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, योग्य देखभाली अभावी गेल्या ९ वर्षांपासून लाखो रुपये किंमतीची ही बोट विनावापर पडून आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या निष्काळजीपणाला जबाबदार असलेल्या अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत तसेच नादुरुस्त बोटीच्या दुरुस्तीबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०१-२०१६) : (१) होय.
(२) होय.
(३) व (४) सन २००५ नंतर चिपळूण शहरात पूर परिस्थिती उद्भवलेली नाही. त्यामुळे बोटीचा वापर करण्यात न आल्याने बोटीचे इंजिन नादुरुस्त झाले. सन २०१२ मध्ये चिपळूण नगरपरिषदेस २५ एच.पी. इंजिनची नवीन रबर बोट जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडून उपलब्ध करण्यात आली आहे. जुन्या फायबर बोटीच्या इंजिनाच्या दुरुस्तीची कार्यवाही जिल्हाधिकाऱ्याकडून करण्यात येत आहे.

नेपाळ व काठमांडू येथे झालेल्या भिषण भूकंपाच्यावेळी राज्यातील विविध पर्यटन संस्थामार्फत गेलेल्या पर्यटकांबाबत

(१९) १८८३९ (१०-०८-२०१५). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेपाळ व काठमांडू येथे दिनांक २५ एप्रिल, २०१५ रोजी झालेल्या भीषण भूकंपाच्यावेळी राज्यातील विविध पर्यटन संस्थामार्फत नेपाळ व काठमांडू येथे किती पर्यटक पर्यटनासाठी गेले होते, त्यापैकी आतापर्यंत किती पर्यटक आपल्या राज्यात सुखरुप पोहचले आहेत व अद्याप किती पर्यटक व गिर्यारोहक भूकंपग्रस्त भागामध्ये अडकून पडले आहेत,
(२) नेपाळ व काठमांडू येथे पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांसाठी शासनाने कोणकोणत्या सोई सुविधा पुरविल्या आहेत,
(३) अद्यापर्यंत किती पर्यटकांचा मृत्यू वा बेपत्ता झाले आहेत त्यांचा शोध घेण्यासाठी शासनाने कशाप्रकारे यंत्रणा राबविली आहे. तसेच मृत अथवा बेपत्ता असलेल्या पर्यटकांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत केली आहे काय, याबाबत सद्यस्थिती काय आहे ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०१-२०१६) : (१), (२) व (३) दिनांक २५.०४.२०१५ रोजी नेपाळ येथे झालेल्या भूकंपानंतर राज्य शासनाने अतिरिक्त निवासी आयुक्त महाराष्ट्र सदन नवी दिल्ली यांच्या नेतृत्वाखाली नवी दिल्ली येथे स्वतंत्र सेलची स्थापना केली. राज्यातील विविध भागातून जिल्हाधिकारी व पर्यटन कंपन्यांकडून प्राप्त माहितीनुसार राज्यातील हजारो पर्यटक नेपाळ येथे पर्यटनास गेले होते. हे सर्व पर्यटक राज्यात सुरक्षित परतले आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून सर्व पर्यटकांच्या परतीची व्यवस्था करण्यात आली होती. महाराष्ट्र सदनाचे अधिकारी व कर्मचारी दिल्ली विमान तळावर तैनात करुन या पर्यटकांना राज्यात परत आणण्याची व्यवस्था त्यांच्याकडून करण्यात आली. त्याचप्रमाणे पर्यटकांसाठी महाराष्ट्र

सदनात निवास व्यवस्था करण्यात आली होती. अवश्यक असले त्यांना रेल्वे आणि विमान तिकिटाची सुविधादेखील महाराष्ट्र सदनाकडून करण्यात आली होती.

मुंबई महानगरपालिका आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या पथकांना शोध व बचाव कार्यासाठी नेपाळ येथे पाठविण्यासाठी सज्ज ठेवण्यात आले होते. मात्र, स्थानिक प्रशासनाकडून शोध व बचाव कार्य पूर्ण करण्यात आल्याने या पथकांना नेपाळ येथे पाठविण्यात आले नाही.

राज्यातील सिंधी समाजाच्या वसाहतील रहिवाशांना सनद देण्याबाबत

(२०) १९००५ (१२-०८-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात धुळे, पिंपरी, चिंचवड व उल्हासनगर अशा अनेक ठिकाणी विस्थापित झालेल्या सिंधी समाजाच्या बऱ्याच वसाहती असून सन १९४७ पासून सिंधी समाज या वसाहतीमध्ये राहत असून, अद्यापही या वसाहतीची सनद सिंधी समाजाला देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधी समाज्याला सनद देण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश देवूनही शासनाने अद्यापही या लोकांना सनद दिले नसून उक्त सनद त्वरीत देण्याबाबतची विनंती लोकप्रतिनीधींनी दि. ५ मार्च, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्र्यांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२१-०१-२०१६) :(१) अंशत: खरे आहे.

सनद मिळण्यापूर्वी ज्यांनी अवैधपणे खोलीची विक्री केली आहे, या व इतर काही कारणांमुळे, काही निर्वासितांना सनदा दिलेल्या नाहीत.

(२), (३) व (४) केंद्र शासनाने निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी केलेले कायदे सप्टेंबर २०१५ मध्ये निरसित केले आहेत. यासंदर्भातील प्रलंबित प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र. ६०७९/२०१० (विशेष अनुज्ञा याचिका क्र. ६७०३/२००८) प्रकरणी दि.२८/४/२०१४ रोजी निकाल दिला आहे. तथापि, या निर्णयाची अंमलबजावणी करण्यामध्ये काही अडचणी निर्माण झाल्या असल्याने मा.महाधिवक्ता महाराष्ट्र राज्य यांचे मत मागविण्यात आले आहे.

लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना लिहिलेले दि.५/३/२०१५ चे निवेदन प्राप्त झालेले नाही.

राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वाढते प्रमाण पाहता शेतकरी व शेतमजुर यांना वयाच्या ६० वर्षानंतर पेंशन मिळण्याबाबत

(२१) १९६८१ (०६-०८-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वाढते प्रमाण पाहता शेतकरी व शेतमजुर (महिला व पुरुष) यांना वयाच्या ६० वर्षानंतर पेंशन मिळावा याकरिता शासनाकडे किसान बिरादरी यांनी वारंवार मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाअंती शेतकरी व शेतमजुर (महिला व पुरुष) यांना वयाच्या ६० वर्षानंतर पेंशन मिळण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (११-०१-२०१६) : (१) होय.

(२) व (३) वयाच्या ६० वर्षावरील शेतकरी व शेतमजुर (महिला व पुरुष) यांना पेन्शन लागु करणेसंबंधी राज्य शासनाची कोणतीही योजना नाही अथवा तसा प्रस्तावही शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औसा मतदारसंघातील किल्लारी या भूकंपग्रस्त शेतकऱ्यांच्या सोयीसाठी किल्लारी उपबाजार पेठेसाठी ८० बाय ८० चौरस मीटर क्षेत्राची जागा कायमस्वरुपी मिळण्याबाबत

(२२) २०१५८ (११-०८-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा मतदारसंघातील किल्लारी या भूकंपग्रस्त शेतकऱ्यांच्या सोयीसाठी किल्लारी उपबाजार पेठेसाठी ८० बाय ८० चौरस मीटर क्षेत्राची जागा कायमस्वरुपी मिळावी, अशा मागणीचे एक निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.पुनर्वसन व मदत कार्य मंत्री यांचेकडे सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, लातूर यांनी दिनांक ५ जून, २००८ रोजी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे प्रस्ताव पाठविल्यानंतर विभागीय आयुक्तांनी काढलेल्या त्रुटीची पूर्तता करून जिल्हाधिकारी, लातूर त्यांचेकडील जावक क्र.२००८, दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ रोजी एक सविस्तर प्रस्ताव मंजुरीसाठी मा.प्रधान सचिव (भूकंपन पुनर्वसन) यांचेकडे सादर केलेला असतानाही आजमितीस शासनाने सदरहू प्रस्तावास मंजुरी दिलेली नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावास मंजुरी देवून किल्लारी उपबाजार पेठेसाठी ८० बाय ८० चौरस मीटरची जागा कायमस्वरुपी देण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०१-२०१६) : (१) होय.

(२) होय.

सदर जागा भाडेपट्ट्यावर देण्यात आली होती. ही जागा कायमस्वरुपी देण्याची मागणी आहे. याविषयी कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भुकंप पुनर्वसनातील वाटप झालेल्या घरांचे वारसा फेर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतला मिळणेबाबत

(२३) २०१५९ (११-०८-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुकंप पुनर्वसनातील वाटप झालेल्या घरांचे वारसा फेर करण्याचा अधिकार , पुरवणी यादी वाटप प्रमाणे कबाले मिळणे, भुकंपन पुनर्वसनातील शिल्लक घरे ग्रामसभा घेऊन वाटप करण्याचा अधिकार, भुकंप पुनर्वसन शिल्लक जागेचे प्लॉटिंग करण्याचा अधिकार, भुकंप पुनर्वसनाला २० ते २२ वर्षे पूर्ण झाले असून घरकुल मंजूर करणे, भुकंप पुनर्वसनातील घरांची खरेदी-विक्री करण्याची मंजुरी मिळणे, हे सर्व अधिकार ग्रामपंचायतला मिळणे,भुकंप पुनर्वसन गावातील अतिक्रमण हटवून हद्दी कायम करून ग्रामपंचायतला आदेश देणे आदी ७ मागण्यांचे एक सविस्तर निवेदन सरपंच ग्रामपंचायत तळणी (ता.औसा, जि.लातूर) यांनी मार्च, २०१५ व तद्पूर्वी मागील २ वर्षापासून सातत्याने मा.महसूल, भूकंपन पुनर्वसन मंत्री, विभागीय आयुक्त, औरंगाबाद जिल्हा, जिल्हाधिकारी, लातूर प्रधान सचिव, महसूल व वने विभाग आदीकडे सादर केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनातील मागण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०१-२०१६) : (१) होय.

(२) भुकंप पुनर्वसन बाबत जिल्हाधिकारी यांचे अधिकार ग्राम पंचायतला देणेबाबतचा प्रस्ताव सद्य:स्थितीत शासनाचे विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली जिल्ह्यामध्ये गतवर्षीच्या दुष्काळासाठी प्रशासनाने तहसिलदारांमार्फत शेतक-यांना जमा केलेली निधी बँकेच्या गोंधळामुळे अद्यापही न मिळाल्यामुळे

(२४) २०८४८ (०६-०८-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हामध्ये गतवर्षीच्या दुष्काळासाठी प्रशासनाने तहसिलदारांमार्फत शेतक-यांना मदतीकरीता त्या त्या बँकेत जमा केलेली निधी बँकेच्या निष्काळजीपणामुळे काही

शेतक-यांच्या हाती पडला नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही शेत-यांचे मोठे नुकसान झाले त्यांना कमी मदत नुकसान झाले त्यांना जास्त मदत अशा प्रकारची तफावत निर्माण झाली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रब्बी पिकांच्या झालेल्या नुकसानीचा सर्व्हे झाला नसल्याने शेतक-यास खरीप हंगामात पेरणी कशी करावी, बी, बियाणे, खेत यासाठी पैसा कोठून आणावा हा गंभीर प्रश्न पडला आहे हेही हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतक-यास आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०१-२०१६) : (१) हे खरे नाही. हिंगोली जिल्हांतर्गत २०१४-१५ करिता रु. ११०.९३ लक्ष इतका निधी प्राप्त झाला होता. सदरचा निधी शेतकऱ्यांचे बँक खाती जमा करण्यात आलेला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) रब्बी पिकांच्या झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने तहसिलदार यांचेकडून मंडळ अधिकारी व तलाठी यांचेमार्फत जिल्हयात झालेल्या अवेळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीचा सर्व्हे करण्यात आला असून, शासन निर्णयाप्रमाणे संबंधित बाधितांना मदत वितरीत करण्यात आली आहे. त्यामुळे खरीप हंगामात पेरणी कशी करावी, बी, बियाणे, खते यासाठी पैसा कोठून आणावा याबाबत प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) ॲडलॅब इमॅजिका प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना नोकरीसाठी डावलेल्याबाबत

(२५) २०९८३ (१०-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) ॲडलॅब इमॅजिका प्रकल्पासाठी तेथील नागरिकांच्या जमिनी स्वस्तात घेतल्या आहेत मात्र नोकरीसाठी स्थानिक नागरीकांच्या मुलांना डावलेले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार स्थानिक मुलांना नोकऱ्या मिळाव्यात म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०१-१२-२०१५) : (१) ॲडलॅब इमॅजिकाने खालापूर तालुक्यातील नागरिकांच्या जमिनी बाजार मूल्यदर तक्त्यानुसार येथ खरेदी केलेल्या आहेत व सदर प्रकल्पातील एकूण १२४७ कामगारांपैकी १२१६ कामगार राज्यातील स्थानिक असून, ३१ कामगार इतर राज्यातील आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुरुड ता.जि. लातूर येथील बस स्थानक दुरुस्तीबाबत व वाढीव बांधकामाबाबत

(२६) २१०३६ (०६-०८-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड ता.जि. लातूर येथील बस स्थानक अत्यंत नादुरुस्त झाले असून प्रवाशांची गैरसोय होत असल्यामुळे सदर बसस्थानकाची दुरुस्ती व वाढीव बांधकाम करण्याबाबत ग्रामपंचायत मुरुड यांनी विभाग नियंत्रक, लातूर यांचेकडे निवेदनाव्दारे माहे एप्रिल, २०१५ वा त्या दरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बसस्थानक दुरुस्तीबाबत व वाढीव नविन बांधकामाबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०५-०१-२०१६) : (१) होय.

(२) सन २०१४ मध्ये मुरुड बसस्थानकाचे आवश्यकतेनुसार विस्तारीकरण, दुरुस्ती व रंगरंगोटी करण्यात आली आहे. सदर बसस्थानक इमारत सुस्थितीत असून तेथील वाहतूकीस पुरेसे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात रस्ता सुरक्षा धोरण राबविण्याबाबत

(२७) २१२४७ (३०-०७-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात होणारे रस्ते अपघात रोखण्यासाठी शासनाने रस्ता सुरक्षा धोरण राबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार धोरण आखण्यात आले आहे काय, तसेच त्याची अंमलबजावणी प्रत्यक्ष सुरू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०९-१२-२०१५) : (१) होय.
(२) राज्याचे रस्ता सुरक्षा धोरण तयार करुन ते दि. १४ ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये जाहीर केले आहे. धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य रस्ता सुरक्षा परिषद अधिक सक्षमतेने कार्यान्वित करणे, राज्याचा स्वतंत्र परिवहन कायदा लागू करणे व रस्ता सुरक्षा कार्यक्रमांना वित्त पुरवठा करण्यासाठी राज्य रस्ता सुरक्षा निधीची स्थापना करणे इ. निर्णय घेण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पाटण तालुक्यातील मौजे बोर्गेवाडी सह मौजे बाटेवाडी जिमणावाडी तसेच म्हारंवड या डोंगरी गावात अतिवृष्टीमुळे मोठया प्रमाणात जमीनी खचण्याचे प्रकार घडले असल्याबाबत

(२८) २१८७५ (०८-०९-२०१५). श्री.शंभूराज देसाई (पाटण) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटण तालुक्यात, मौजे बोर्गेवाडी सह मौजे बाटेवाडी जिमणावाडी तसेच म्हारंवड या डोंगरी गावात अतिवृष्टीमुळे मोठया प्रमाणात जमिनी खचण्याचे प्रकार घडले आहेत त्याचबरोबर या गावाच्या वर असणारे डोंगरातील मोठमोठया दरडी यामुळे गावांना धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गावांनी त्यांचे तातडीने पुनर्वसन करणेबाबत शासनाकडे जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांकडून सातत्याने मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाटण तालुक्यातील ज्या गावातील जमिनी अतिवृष्टीमुळे खचल्या आहेत तसेच ज्या गावांमध्ये दरडी आहेत ज्यांच्यामुळे गावांस धोका निर्माण होणार आहे अशा गावांची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती पाटण विधानसभा मतदारसंघातील जमीन खचलेल्या गावांचे तसेच दरडीचा धोका असणाऱ्या गावांचे तातडीने पुनर्वसन करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२७-०१-२०१६) :(१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) कोयना भूकंप पुनर्वसन निधी समिती मुंबई यांचेकडून पाटण तालुक्यातील कडा कोसळणे, भुकंपामुळे नुकसान झालेल्या गावांचे पुनर्वसन करणे व कामासाठी रुपये ३०९.११ लाख अनुदान मंजुर करण्यात आले असुन त्यापैकी ५० टक्के रक्कत अदा करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नवनिर्मित हिंगोली जिल्हयामध्ये सेनगाव या तालुक्याचे ठिकाणी नवीन आगार व जिल्हा मुख्यालयी स्वतंत्र विभागीय कार्यालय व विभागीय कार्यशाळा स्थापन करण्याबाबत

(२९) २२६४१ (११-०८-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयामध्ये सेनगाव या तालुक्याचे ठिकाणी नवीन आगार व जिल्हा मुख्यालयी स्वतंत्र विभागीय कार्यालय व विभागीय कार्यशाळा स्थापन करण्यात यावी अशा आशयाचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर चौकशी केली आहे काय

(३) असल्यास, चौकशीअंती सदरहू नवीन बस आगार, विभागीय कार्यालय व विभागीय कार्यशाळा स्थापन करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०५-०१-२०१६) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) विभागीय कार्यालय व विभागीय कार्यशाळा स्थापन करण्याच्या अनुषंगाने तपासणी केली असता सद्य:स्थितीत आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नसल्याचे आढळून आले. तसेच महामंडळाच्या आगार निर्मितीच्या प्रचलित निकषानुसार सेनगाव येथे आगार निर्मिती करता येणार नाही, असे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आष्टी तालुक्यात (जि.बीड) पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई आजतागायत मिळाली नसल्याबाबत

(३०) २२७२७ (०८-०९-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी तालुक्यातील (जि.बीड) अंभोरा, बीडसांगवी, देवीनिमगावसह इतर गावांत सन २०१४ मध्ये वादळी वाऱ्यासह पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालासह घरांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येऊन सुमारे वर्षभराचा कालावधी लोटला तरी अद्यापही पीडीत शेतकऱ्यांना शासनाकडून अर्थसहाय्य मिळाली नसल्याची बाब माहे जून, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी अंती शेतकऱ्यांना तातडीने अर्थसहाय्य अदा करण्याबाबत शासनाले काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०१-२०१६) : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) भाजपा सरचिटणीस श्री.राम खाडे यांनी विभागीय आयुक्त यांचेकडे सदर प्रकरणी लेखी निवेदन देऊन चौकशीची मागणी केली. त्याबाबत सर्व बाधित गावांमध्ये फेर चौकशी पंचनामे करणेबाबत तलाठी यांना आदेशित करण्यात आले होते. त्यानंतर संबंधित तलाठी यांचे फेर चौकशी पंचनामे प्राप्त होताच त्या गावातील लाभार्थ्यांना धनादेश वितरीत करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौदा (जि.नागपूर) तालुक्यातील एनटीपीसी प्रकल्पबाधितांना नोकरी देण्याचे आश्वासन देऊनही अद्यापही कोणतीच कार्यवाही केली नसल्याबाबत

(३१) २३०९१ (१०-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौदा (जि.नागपूर) तालुक्यातील एनटीपीसी प्रकल्पाकरिता ज्या शेतक-यांच्या जमिनी संपादित केल्या त्यांना अद्यापपर्यंत योग्य तो मोबदला तसेच प्रकल्पबाधितांना नोकरी देण्याचे आश्वासन देऊनही अद्यापही कोणतीच कार्यवाही केली नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विरोधात प्रकल्पग्रस्तांनी वेळोवेळी आंदोलन करुनही शासनाने या संदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पाबाधितांना नोक-या व जमिनीचा योग्य तो मोबदला देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०१-२०१६) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) मौदा तालुक्यातील (जि.नागपूर) एनटीपीसी प्रकल्पातील सर्व ७२१ खातेदारांना टप्पा-१ व टप्पा-२ अंतर्गत १०० टक्के मोबदला विकसित भुखंडाऐवजी २ लक्ष रु. प्रति एकर रुपये व सानुग्रह अनुदान असे रुपये १७२.१७ कोटीचे वाटप करण्यात आले.

प्रकल्पांतर्गत १६५ प्रकल्पग्रस्तांना आय.टी.आय. चे प्रशिक्षण देऊन त्यांना प्रकल्पाच्या वेगवेगळ्या एजंसीमध्ये कामावर घेण्यात आलेले आहे. तसेच २७५ प्रकल्पग्रस्तांना मजुर वर्गात सामावुन घेण्यात आले. ३० प्रकल्पग्रस्तांची वाहने भाडेतत्वावर प्रकल्पामध्ये कार्यरत असून ६ प्रकल्पग्रस्तांना दुकानाचे गाळे वितरीत करण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त प्रकल्पग्रस्तांच्या सहकारी संस्था/ प्रकल्पग्रस्त ठेकेदार यांचेकरिता अंदाजे ३ कोटी रु. ची कामे मंजूर करण्यात आलेली आहेत.

नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम रु. ५ लक्ष प्रमाणे माहे ऑक्टोबर, २०१५ पर्यंत ६५९ प्रकल्पग्रस्त कुटुंबापैकी २०४ कुटुंबांना एकूण १०.२० कोटी रु. वाटप करण्यात आलेले आहेत. उर्वरित प्रकल्पग्रस्तांचे मागणीनुसार वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

प्रकल्पांतर्गत सर्व प्रकल्पग्रस्तांना नोकरीची समान संधी उपलब्ध करण्याचे दृष्टीने प्रकल्पाकरिता आवश्यक ती सर्व जमिन (टप्पा-२ अंतर्गत ॲशडॅककरिता संपादित होणाऱ्या जमिनीसह) संपादित झाल्यानंतर प्रकल्पग्रस्तांच्या नोकरभरतीची प्रक्रिया सुरु करणे योग्य राहील असे एनटीपीसी मौदा यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उदगीर (जि. लातूर) बसस्थानकाची इमारत सन १९७६ रोजी बांधली असून ती पुर्णता मोडकळीस आल्याबाबत

(३२) २३६०२ (११-०८-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील उदगीर बसस्थानकाची इमारत सन १९७६ बांधली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उदगीर हे शहर तीन राज्यातील बस आगाराशी जोडलेले असून उदगीर बस आगारात असलेली इमारत ही पुर्णता मोडकळीस आल्यामुळे लाखो प्रवाशांच्या जीवाला धोका आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जीवित वा वित्तहानी होणार नाही यासाठी प्रशासनाने नव्या इमारत बांधणीसाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०५-०१-२०१६) : (१) होय.

(२) व (३) उदगीर येथील बसस्थानकाच्या काही भागांची दुरुस्त करणे आवश्यक असल्याने बसस्थानकाचे नुतनीकरण/आधुनिकीकरणासाठी सन २०१५-१६ मध्ये शासनाच्या सर्वसाधारण योजनेमधून रु. ०१.०० कोटी रकमेच्या कामास राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून सदर कामासाठी ई-निविदा मागविण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यात ६६ गावे डोंगरकड्याखाली असल्याने तेथील लोकांच्या जिवीतास पावसाळ्यात धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याबाबत

(३३) २४३९४ (१०-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात ६६ गावे डोंगरकड्याखाली वसल्याचे माहे मे, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राधानगरी तालुक्यात ५५ पन्हाळा १, शाहूवाडी १, भुदरगड ८ गडहिंग्लज १ अशी ६६ गावांचा समावेश होतो, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर डोंगर पायथ्याशी व डोंगरकड्या खाली वास्तव्यास असणाऱ्या ४६,४०७ लोकांच्या जिवीतास पावसाळ्यात धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, माळीण सारखी परिस्थिती होण्यापूर्वी अशा गावांची योग्य त्या ठिकाणी स्थलांतर करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०१-२०१६) : (१) अंशत: खरे आहे.
(२) भुदरगड पन्हाळा, शाहूवाडी राधानगरी आणि गडहिंग्जल तालुक्यातील एकूण २० गांवे डोंगर कड्याखाली वसलेली आहेत.
(३) अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी, पन्हाळा , शाहूवाडी, भुदरगड, गडहिंग्जल तालुक्यातील एकूण ५२३१ लोकांच्या जिवितास धोका असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी कळविले आहे.
(४) व (५) या गावांचे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा आणि जियोलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया यांचे मार्फत तांत्रिक सर्व्हेक्षण करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

धामोड (ता.राधानगरी जि.कोल्हापूर) येथील कृषी कार्यालयाची इमारत वापराविना पडून असल्याबाबत

(३४) २४४०३ (१२-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धामोड (ता.राधानगरी जि.कोल्हापूर) येथील कृषी कार्यालयाची इमारत वापराविना पडून असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने १० वर्षापूर्वी ३ लाख रुपये खर्च करुन बांधलेली इमारत कृषी विभागाने ताब्यात न घेतल्याने वापराविना पडून आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारत पूर्ववत शासकीय कामी येणेकरिता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१८-०३-२०१६) : (१) होय.
(२) होय.
(३) व (४) धामोड ता.राधानगरी या मुख्यालयात काम करणाऱ्या ग्राम कृषि विस्तारकांच्या निवासस्थान बांधकामासाठी कृषि विभागाने प्रशासकीय मंजूरी देऊन सार्वजनिक बांधकाम

विभाग यांचेकडे निवासस्थान बांधणेसाठी अनुदान वर्ग केले होते. तथापि, सार्वजनिक बांध्ंकाम विभागाकडून सदर निवासस्थान दुरुस्तीचे काम करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे तसेच सदर इमारतीचा ताबा अधिक्षक अभियंता सा.बां. विभाग, कोल्हापूर यांचेकडेच असल्यामुळे सदरहू इमारतीमधील अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करुन सदर इमारत कृषि विभागास हस्तांतरित करण्याबाबत अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, कोल्हापूर यांना तात्काळ आदेश देण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास सुचित करण्यात आले आहे.

मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यासाठीचे १०० कोटी रुपये देण्यात आले मात्र अनुदानापोटी मागील दोन महिन्यापासून प्रतिक्षेत असलेले ४३५ कोटी शासनाने दिले नसल्याबाबत

(३५) २५१८० (०६-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद विभागातील खरीप नियोजनाची आढावा बैठक मा.महसूलमंत्र्यांनी घेतल्यानंतर मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यासाठीचे १०० कोटी रुपये देण्यात आले मात्र अनुदानापोटी मागील दोन महिन्यापासून प्रतिक्षेत असलेले ४३५ कोटी शासनाने दिले नसल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे अहे काय,

(२) असल्यास, खरीप अनुदानाची उर्वरित रक्कम देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०१-२०१६) : (१) अंशत: खरे आहे.

(२) शासन निर्णय दि. ८/७/२०१५ अन्वये विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना एकूण रु. ३५२.२४ कोटी निधी वितरीत करण्यात आला होता. त्यापैकी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना रु.४.२३ कोटी इतकी निधी वितरीत करण्यात आला असून, निधी वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पैनगंगा काठावर वसलेल्या मौजा भिमकुंड (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथे पुरामुळे आजवर एकूण ११२ कुटुंबे पूर्णत: बाधीत झाल्याबाबत

(३६) २५२३८ (०६-०८-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा भिमकुंड (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथे पुरामुळे आजवर एकूण ११२ कुटुंबे पूर्णत: बाधीत होऊन उद्ध्वस्त झालेली आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ११२ बाधित पुरग्रस्तांचे पुर्नवसन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी मा.महसुल व मदतकार्य, पुनर्वसन मंत्र्यांना दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनानुसार पूरग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०१-२०१६) : (१) होय.
(२) होय.
(३) पुरग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत सर्वकष धोरण ठरविण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे फाटकवाडी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील ३९ गावाच्या लाभक्षेत्रामध्ये चंदगडचा समावेश नसतांना लिपिकाच्या नजर चुकीमुळे चंदगडमध्ये समावेश केल्याने ४७ शेतकऱ्यांना त्याचा त्रास सहन करावा लागल्याबाबत

(३७) २५५३६ (११-०८-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे फाटकवाडी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील ३९ गावाच्या लाभक्षेत्रामध्ये चंदगडचा समावेश नसतांना लिपिकाच्या नजर चुकीमुळे चंदगडमध्ये समावेश केल्याने ४७ शेतकऱ्यांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी मा.मुख्यमंत्री यांना शेतकऱ्यांनी माहे जून, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सदर प्रकरणी मा.महसूल व पुनर्वसन मंत्री यांना सदर नोंदी रद्द करण्याची मागणी चंदगडचे लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ जून, २०१५ रोजी केली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती चंदगड गाव लाभक्षेत्रात नसल्याने नोंदी रद्द करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२१-०३-२०१६) : (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम, १९८६ च्या कलम ११(१) च्या मूळ अधिसूचनेत चंदगड गावाचा समावेश नव्हता. तथापि, लाभक्षेत्राच्या सविस्तर सर्व्हेक्षणाअंती प्रसिध्द करण्यात आलेलया कलम ११(१) च्या अधिसूचनेनुसर चंदगड गावातील २५ हे. १२ आर क्षेत्राचा लाभक्षेत्रात समावेश करण्यात आला आहे.

(२), (३), (४) व (५) सदर प्रकरणी एका प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दि. १.३.२०१५ व दि. १.६.२०१५ रोजी निवेदन देऊन नोंदी रद्द करण्याची मागणी केली आहे. तथापि, संदर्भिय क्षेत्राचा लिपिकाच्या नजरचुकीने लाभक्षेत्रात समावेश झालेला नसून सविस्तर सर्व्हेक्षणाअंती अधिनियमातील विहित तरतूदीनुसार लाभक्षेत्रात समावेश करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

दर्यापूर तालुक्यातील (जि.अमरावती) सन २००७ मध्ये २० गावांचे पुर्नवसन करण्यात आल्याबाबत

(३८) २५६०२ (१७-०८-२०१५). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर तालुक्यातील (जि.अमरावती) सन २००७ मध्ये २० गावांचे पुर्नवसन करण्यात आले आहे, त्यांना पुर्नवसन मध्ये कोणत्याच सोयी उपलब्ध करुन देण्यात आल्या नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्वसन मध्ये सोई पुरविण्याबाबत मा.पुनर्वसन मंत्री यांना दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दर्यापूर तालुक्यातील (जि.अमरावती) येथील २० गावांना सोई-सुविधा पुरविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०१-२०१६) : (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) पुनर्वसन अंतर्गत द्यावयाच्या नागरी सुविधा पुरवण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

देवळा (जि.नाशिक) या गावातील बस स्थानकातील सांडपाणी थेट आठवडेबाजारात येत असल्याने नागरीकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याबाबत

(३९) २६००८ (११-०८-२०१५). डॉ.राहूल आहेर (चांदवड) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळा (जि.नाशिक) या गावातील बस स्थानकालीत सांडपाणी थेट आठवडेबाजारात येत असल्याने नागरीकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सांडपाण्याची विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२०-०१-२०१६) : (१) होय.
(२) देवळा बसस्थानकातील शौचालयात पुरुषांसाठी ४ संडास व ६ मुताऱ्या तसेच स्त्रियांसाठी १ संडास व १ मुतारी अशी व्यवस्था आहे. सदर शौचालयाचे देखभालीची जबाबदारी अध्यक्ष, महाराष्ट्र कल्याण समिती, पिंपरी, पुणे या संस्थेवर सोपविलेली असून सदर कराराची मुदत ८ मे, २०२० पर्यंत आहे. तथापि, परिचालन करणाऱ्या संस्थेकडून शौचालयाची देखभाल होत नसल्याने सदर संस्थेविरुध्द कारवाई करण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मंगरूळ, (ता.चोपडा, जि.जळगांव) येथे छापा टाकून कापसाच्या बनावट बियाण्यांची ५३ पाकिटे जप्त केल्याबाबत

(४०) २६४४१ (०८-०९-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगरूळ (ता.चोपडा, जि.जळगांव) येथे वसंत निकम यांच्या घरावर छापा टाकून कापसाच्या निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांची ५३ पाकिटे दिनांक २५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास जप्त केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-१२-२०१५) :(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, चोपडा तालुक्यातील अछावद पोलीस ठाणे येथे भाग ६/३०१९/२०१५ अन्वये आरोपीविरुध्द फिर्याद दाखल करण्यात आलेली आहे. प्रथम वर्ग न्यायालय ता. चोपडा, जि.जळगांव येथे क्रिमीनल केस क्र. ११६/२०१५ अन्वये दाखल करण्यात आलेली असून न्यायालयीन कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) विलंब झालेला नाही.

गारपीटग्रस्त शेतक-यांना द्यावयाच्या निधीचे वाटप झाले नसल्याबाबत

(४१) २६५९१ (१०-०८-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गारपीटग्रस्त शेतक-यांना द्यावयाच्या निधीचे धनादेश औरंगाबाद प्रशासनाने दिले असतांना यातील सुमारे १२ कोटींची रक्कम वाटप झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-०१-२०१६) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यातील कांदाचाळ, शेततळे, ट्रॅक्टर, द्राक्षबाग अच्छादन व सोलर पंप अनुदान जिल्ह्याला मिळाले नसल्याबाबत

(४२) २६८६५ (१७-०८-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील कांदाचाळ, शेततळे, ट्रॅक्टर, द्राक्षबाग अच्छादन व सोलर पंपासाठी शासनस्तरावरुन देण्यात येणारे अनुदान जिल्ह्याला मिळाले नसल्याने सदरचे प्रलंबित अनुदान तातडीने मिळण्याची मागणी जिल्हापरिषद अध्यक्ष यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २७ मे, २०१५ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१५-०३-२०१६) : (१) हे अंशत: खरे आहे.

याबाबत अध्यक्षा, जिल्हा परिषद नाशिक यांनी दि. २६ मे, २०१५ च्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांना विनंती केली आहे.

(२) सन २०१५-१६ करीता, नाशिक जिल्ह्यासाठी राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत विविध घटकांकरीता रु. ११४७.०९ लाखांचा वार्षिक कृति आराखडा मंजूर केलेला आहे. त्यामध्ये शेततळे ट्रॅक्टर या घटाकाचा समावेश आहे. तसेच राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत नाशिक, जिल्ह्यासाठी, प्रलंबित कांदाचाळीकरीता रु.१४४५.११ लाख व नविन कांदाचाळींकरीता रु.१६६.९० लाख असा एकूण रु. १६१२.०१ लाख निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

बागांचे गारपिटीपासून होणारे नुकसान वाचविण्यासाठी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत, गारपीटरोधक जाळी (हेलनेट) या घटकाकरिता अनुदान देण्यात येते. तसेच अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे बागांचे होणारे नुकसान वाचविण्यासाठी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानामध्ये “प्लास्टिक शीट” या घटकाचा अंतर्भाव करण्याबाबत केंद्र शासनास दि. ०५/०२/२०१६ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे.

राज्याचे, सौर कृषि पंप आस्थपित करण्याचे धोरण शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दि. २७.०३.२०१५ च्या अन्वये जाहिर करण्यात आले आहे. सदर धोरणांतर्गत नाशिक जिल्ह्यामध्ये १३० सौर कृषित पंप महावितरणामार्फत आस्थापित करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बदनापूर तालुक्यात नवीन बसस्थानक उभारण्याबाबत

(४३) २७४९२ (१२-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदनापूर तालुक्यात नवीन बसस्थानक उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बदनापूर तालुक्याच्या ठिकाणी तातडीने नवीन बसस्थानक उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०५-०१-२०१६) : (१) हे खरे आहे.

(२) बदनापूर (जि.जालना) येथे १२.२०x३ मिटर आकाराचा प्रवासी निवारा बांधलेला होता. रस्ता रुंदीकरणाकरीता सदर बांधकाम पाडण्यात आले. सद्य:स्थितीमध्ये बदनापूर येथून १४६ रा.प. फेऱ्या चालनामध्ये आहेत. बदनापूर येथे रा.प. महामंडळाच्या मालकीची जागा नाही. ग्रामपंचायतीने अपर दुधना प्रकल्पाची जलसंपदा विभागाची जागा प्रस्तावित केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कळंब व उस्मानाबाद तालुक्यातील शेतकऱ्यांचे निकृष्ट दर्जाचे सोयाबीन बियाणांमुळे अतोनात नुकसान होत असल्याबाबत

(४४) २८१७३ (२७-१०-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब व उस्मानाबाद तालुक्यातील (जिल्हा उस्मानाबाद) शेतकऱ्यांचे गत वर्षी निकृष्ट दर्जाचे सोयाबीन बियाणांमुळे अतोनात नुकसान झाले होते, यावर्षी सुध्दा निकृष्ट दर्जाचे बियाणे आल्याचे माहे जुन, २०१५ मध्ये वा त्यारदरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील हंगामात निकृष्ट दर्जाचे बियाण्यामुळे झालेली नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच अशा प्रकारच्या निकृष्ट दर्जाचे बियाणे विक्री प्रकरणातून शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-१२-२०१५) : (१) हे खरे नाही.

(२) सन २०१४-१५ मध्ये उस्मानाबाद व कळंब तालुक्यातील ४७८ शेतकऱ्यांना सोयाबीन बियाण्याच्या १५२१ बॅग बदलून देण्यात आल्या तर, ४८५ शेतकऱ्यांना ११८४ सोयाबीन बियाण्याच्या बॅगांच्या बदल्यात रु. २६,२१,१५०/- रोख रक्कम अदा करण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांना जिल्हा ग्राहक मंचात फिर्याद दाखल करण्यासाठी क्षेत्रीय पंचनामे देऊन मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

(३) कार्यवाही करण्यात आलेली असून विलंब झालेला नाही.

तीर्थक्षेत्र तुळजापुर शहरात पाच किमीच्या परिसरात संपूर्ण दारुबंदी करण्याचा ठराव नगर पालिकेने घेतल्याबाबत

(४५) २८१८३ (२७-१०-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तीर्थक्षेत्र तुळजापुर शहरात पाच किमीच्या परिसरात संपूर्ण दारुबंदी करण्याचा ठराव नगर पालिकेने दिनांक २२ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठरावाबाबत शासनाची भूमिका काय आहे व प्रस्तावावर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-१२-२०१५) :(१) हे अंशत: खरे आहे. तथापि सदर ठरावामध्ये तुळजापूर शहरात पाच कि.मी. परिसरात संपूर्ण दारुबंदी करण्याच्या उल्लेख दिसून येत नाही.

(२) शासन अधिसूचना, दि.२५.३.२००८ व दि. १२.०२.२००९ नुसार दारुबंदीबाबतची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. सदर प्रकरणी शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार ठराव प्राप्त न झाल्याने कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याच्या एस.टी. महामंडळाच्या आगार क्षेत्रात असलेल्या व्यावसायिक गाळे धारकांनी अतिरिक्त जागा वापरल्याबाबत

(४६) २८२२२ (२७-१०-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या एस.टी. महामंडळाच्या आगार क्षेत्रात असलेल्या व्यावसायिक गाळे धारकांनी अतिरिक्त जागा वापरुन एस.टी. महामंडळाला ४७ कोटीहून अधिक आर्थिक नुकसान केले असल्याचे सुरक्षा आणि दक्षता विभागाचे मुख्य अधिकारी विनित अग्रवाल यांनी एस.टी. महामंडळाच्या वाहतुक महाव्यवस्थापकांना पाठविलेल्या पत्रात नमूद केल्याचे दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त महामंडळातील काही कर्मचारी व अधिकारी यांचेही संगनमत असल्याचा आरोप सुरक्षा आणि दक्षता विभागाने केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती चौकशी केली आहे,
(४) असल्यास, चौकशीअंती दोषी व्यक्तींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०५-०१-२०१६) : (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) सुरक्षा व दक्षता विभागाने केलेल्या तपासणीत एकूण २७६७ वाणिज्य आस्थापनांपैकी तपासणी केली असता १९४८ आस्थापनाधारक करारानुसार ठरवुन दिलेली जागा वापरतात असल्याचे व ७७० आस्थापनाधारक हे करारानुसार ठरवुन दिलेल्या जागेपेक्षा अतिरिक्त जागा अनधिकृतपणे वापरत असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार राज्य परिवहन महामंडळाने दिनांक २८.७.२०१५ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने विभागीय पातळीवर स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त समितीमार्फत प्रत्यक्ष तपासणी करुन नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारावर अतिरिक्त जागा वापरापोटीची रक्कम संबंधितांकडून वसूल करण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाहीखाली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात स्थापन करण्यात आलेल्या कृषीमूल्य आयोगाबाबत

(४७) २८२७३ (१३-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतीमालाला किफायतशीर भाव मिळावेत व ग्राहकांना वाजवी दरात शेतीमाल खरेदी करता यावा याकरिता शेतमाल भाव समितीचे पुनर्गठन करुन केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यातही कृषीमूल्य आयोग माहे एप्रिल, २०१५ च्या सुमारास स्थापन करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयोगाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्याची मुदत किती राहणार आहे,
(३) आयोगाचे कार्यक्षेत्र व त्याची फलनिष्पती काय आहे ?

श्री. एकनाथराव खडसे (१७-०२-२०१६) :(१) राज्य शेतमाल भाव समितीचे राज्य कृषि मूल्य आयोगामध्ये रुपांतर दि. २३ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आले आहे.
(२) आयोगाचे सर्वसाधारण स्वरुप पुढीलप्रमाणे आहे, राज्य कृषि मूल्य आयोगामध्ये कृषि क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती तथा कृषि मूल्य/शेतमाल भाव यासंबंधी जाणकार असणारी शासन नियुक्त व्यक्ती अध्यक्ष असून चारही कृषि विद्यापिठाचे कुलगुरु, विभाग प्रमुख कृषि अर्थ शास्त्र विभाग, अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे, निमंत्रित लोक प्रतिनिधी, निमंत्रित शेतकरी प्रतिनिधी, यांचा सदस्य म्हणून तसेच सहसंचालक, राज्य कृषि

मूल्य आयोग कक्ष, मंत्रालय, मुंबई यांचा सदस्य सचिव म्हणून समावेश आहे. आयोगाला मुदत घालण्यात आलेली नाही.

(३) आयोगाची कार्यकक्षा शासन निर्णय क्र. राकृमुआस्था-२०१४/ प्र.क्र.५९/ शेमाभास-११ अे दि. २३ एप्रिल, २०१५ मध्ये सविस्तर देण्यात आलेली आहे. त्यातील ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत :-

१) प्रमुख शेती पिकांच्या उत्पादन खर्चाचा वास्तववादी अंदाज काढून त्या संदर्भात राज्य शासनाला शिफारशी पाठविणे.

२) पीक उत्पादन खर्चाचा वास्तववादी अंदाज काढण्याकरिता प्रमाणित संकल्पना, शास्त्रशुध्द पध्दती व भौगोलिक परिस्थितीचा अवलंब करणे.

३) राज्य शासन आणि केंद्रिय कृषि मूल्य व किंमत आयोग यांच्यामध्ये समन्वय ठेवणे, इत्यादी

राज्य कृषि मूल्य आयोगामार्फत खरीप, रब्बी व ऊस हंगामातील १८ शेतीपिकांच्या उत्पादन खर्चाची माहिती गोळा करुन ती केंद्रीय कृषि मुल्य व किंमत आयोगाला पाठविली जाते. सदर माहिती केंद्र शासनृ, राज्य शासन व अन्य इतर शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थांना उपयुक्त ठरते, ही फलनिष्पत्ती आहे.

निफाड तालुक्यातील नकली किटकनाशके तयार करुन शेतक-यांची फसवणुक करणा-या डिपॉड कंपनीवर कारवाई करणे बाबत

(४८) २८६५५ (१३-०१-२०१६). श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड तालुक्यातील शेतक-यांची डिपॉड कंपनीने नकली किटक नाशके तयार करुन फसवणुक केली असल्याची तक्रार स्थानीक लोकप्रतिनीधींनी दि ९/९/२०१५ रोजी वा त्यादरम्यान मा. कृषी मंत्री यांच्याकडे तसेच अवकाळी पावसाच्या चर्चेत भाग घेतांना विधान सभेत केलेली आहे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांची फसवणुक करणा-या डिपॉड कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६) : (१) हे खरे आहे.

(२) डयुपॉट कंपनीचे बेनिविया या उत्पादनास कीटकनाशक अधिनियम १९७१ नियम १८ ते २० अन्वये विक्री बंद आदेश देण्यात आला आहे. तसेच, कीटकनाशक अधिनियम कलम ५ नुसार बेनिविया या उत्पादनाचा नमुना विश्लेषणासाठी केंद्रिय किटकनाशक प्रयोगशाळा फरीदाबाद (हरीयाना) येथे पाठविण्यात आला असून नमुना विश्लेषणानंतर पुढील उचित कार्यवाही करण्योत येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील जि.प.च्या कृषी विभागांतर्गत राबविण्यात येणा-या कृषी योजना शासनाने २००१ पासून काढून घेतल्या बाबत

(४९) २८९८६ (१३-०१-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जि.प.च्या कृषी विभागांतर्गत राबविण्यात येणा-या कृषी योजना शासनाने २००१ पासून काढून घेतल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास,राज्य व केंद्र पुरस्कृत योजना कडधान्य विकास कार्यक्रम, गळीत धान्य विकास, तृणधान्य विकास योजना, आळीम्बी विकास योजना गतिमान मका योजना उस विकास योजना, ठिबक व तुषार योजना इत्यादी योजना २००१ पूर्वी जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येत होत्या त्या सदर विभागाकडून काढून घेण्यात आली हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना पूर्ववत जि.प. कृषी विभागाकडेच द्याव्यात अशी मागणी औरंगाबाद जि.प.च्या उपाध्याक्षांनी माहे सप्टेबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा. कृषी मंत्री यांना लेखी पत्राद्वारे केली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१३-०३-२०१६) : (१) हे खरे नाही.

कृषि विभागाच्या ३७ योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतर करण्यास दि. १/२/२००१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. तथापि, अंमलबजावणी संदर्भात प्रशासकीय व वित्तीय अडचणी विचारात घेवून सदर आदेशास दि. १/३/२००१ अन्वये पुढील आदेश होईपर्यंत "जैसे थे" स्थिती ठेवण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. सद्यस्थितीत प्रकरण मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे न्यायप्रविष्ठ आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर निवेदन प्राप्त झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीकविमा मिळाला नसले बाबत

(५०) २९०९१ (१३-०१-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील सुमारे ५३० शेतकऱ्यांनी गतवर्षी पिकविमा उतरविला होता हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी एकही शेतकऱ्याला विमा कंपनीकडून १ रु. ची देखील मदत मिळाली नाही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनीकडून मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१७-०२-२०१६) : (१) व (२) राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत खरीप २०१४ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील एकुण ५७२ शेतक-यांनी रु. १.०४ लाख विमा हप्ता भरुन १९०.५९ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षीत केले होते. त्यापैकी ४ शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले असून पात्र ठरलेल्या शेतक-यांना सुत्रानुसार नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आली आहे.
(३) राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत देण्यात येणारी नुकसान भरपाई ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनूसार भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात येते. खरीप २०१४ मध्ये नुकसान भरपाईस पात्र ठरलेल्या शेतक-यांना वरीलप्रमाणे नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.